जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६२८ दिनांक - १८/०८/२०२३**

समर्थ पोलीस ठाणे पुणे शहर

## अमन युसुफ पठाण ऊर्फ खान (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

आरोपी नामे अमन युसुफ पठाण ऊर्फ खान (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार नामे १)आवेज अश्पाक शेख,वय-२२ वर्षे,रा.बाबुभाई वाडा,गणेश पेठ,पुणे २)स्वप्नील प्रशांत शिंदे, वय-१९ वर्षे,रा.संभाजीनगर,के.के.मार्केट बस स्टॉप जवळ,धनकवडी,पुणे (टोळी सदस्य) यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी फिर्यादी व त्यांचे काका,तसेच फिर्यादी यांचे सोसायटीचे चेअरमन व इतर सदस्य सर्व मिळुन आवेज यास समजावुन सांगण्यासाठी अशोक चौक येथे जात असतांना, फिर्यादी व त्यांच्यासोबत असणारे इतर इसम अशोक चौक येथे आले असतांना,फिर्यादी यांना बघुन आवेज व अमन याने यापुर्वीच्या भांडणाचा राग मनात धरुन रिक्षामधुन खाली उतरुन आवेज याने त्याच्या हातामधील धारदार हत्यार फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारून त्यांना गंभीर जखमी केले. म्हणुन फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने **समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिष्टर नंबर १५५/२०२३,भा.दं.वि.कलम ३०७, ३२४,५०४,५०६,३४,क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **अमन युसुफ पठाण ऊर्फ खान,वय-२३,रा.नाना पेठ,पुणे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार नामे १)आवेज अश्पाक शेख,वय-२२ वर्षे,रा.बाबुभाई वाडा,गणेश पेठ,पुणे (टोळी सदस्य) २)स्वप्नील प्रशांत शिंदे,वय-१९ वर्षे,रा. संभाजीनगर चाळ नं.०२,के.के. मार्केट बस स्टॉप जवळ,धनकवडी,पुणे (टोळी सदस्य)** यांना अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपी अमन युसुफ पठाण ऊर्फ खान (टोळी प्रमुख) यांनी त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्ह्यात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःचे संघटीत टोळी तयार करुन स्वतःचे टोळीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी गुन्हे केले असुन त्यामध्ये खुनाचा प्रयत्न करणे, धारदार हत्यारे जवळ बाळगुन दहशत करणे इ. सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहे. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने बेकायदेशिरपणे स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii) व ३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर,श्री.सुरेश शिंदे यांनी मा.पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-०१ श्री.संदिपसिंह गिल यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजिष्टर नंबर १५५/२०२३, भा.दं.वि.कलम ३०७,३२४,५०४,५०६,३४,क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ३ व ७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)सह१३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), व ३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे शहर, श्री. अशोक धुमाळ हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०१ श्री.संदीपसिंह गिल, मा.सहायक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग,पुणे श्री.अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,समर्थ पोलीस स्टेशन,श्री.सुरेश शिंदे, पोलीस निरीक्षक, गुन्हे,श्री.प्रमोद वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक,सुनिल रणदिवे, पोलीस अंमलदार,संतोष थोरात, किरण शितोळे यांनी सदरची कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर आयुक्त म्हणुन कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.**<u>त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ४९ वी कारवाई आहे.</u>**